(68) (81) (12)

# नमुना दोन

ग्राम :- ठाणे

दुरध्वनी :-०२२-२५३६२४४५

ई मेल :- zpednprim@yahoo.in फॅक्सः-

जावक क्रं. :- ६४ दिनांकः-२०/०२/२०१३

जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयः- शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, ठाणे (महाराष्ट्र राज्य)

व्यवस्थापक :- **नॅशनल सेंटर फॉर रुलर डेव्हल्पमेंट. पुणे.**

विषयः - बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांचा बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २००९ याच्या नियम, ११ पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

माननीय महोदय/ महोदया,

आपल्या दिनांक **१८/०२/२०१३** च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलाला पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणीच्या आधारे,

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प.ठाणे. दिनांक ०१/०४/२०१३ पासुन दिनाक ३१/०३/२०१६ पर्यन्त तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी** करिता **स्टर्लिंग स्कुल नेरुळ , सेक्टर ११, नेरुळ, नवी मुंबई पिनकोड - ४०० ७०६** या इंग्रजी माध्यमाच्या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.

०१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

०२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११(जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.

०३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित घटकांतील बालकांस, पहिल्या इयत्तेत, त्या विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे कीं, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

०४.परिच्छेद तीन मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅंक खाते देण्यात येईल.

०५. संस्था/ शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

०६. कोणत्याही बालकास वयास पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

६९ (13)

०७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन ) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यन्त कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षांच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने/ शिक्षकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वःला गुंतवून घेवू नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

०८. शाळा समूचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमांचे पालन करील.

०९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

* शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ. :- १३१००.३१ चौ.मी.

* एकुण बांधकाम क्षेत्र :-२८३७.६५ चौ.मी.

* खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- ९००० चौ.मी.

* वर्गखोल्या संख्या :- ७

* कार्यालय- नि-भांडार-नि- मुख्याध्यापकाची खोली :- ०३

* मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे

- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.- आहे. मुलांसाठी-०३ स्वच्छतागृह व १८ मुतारी संख्या मुलीसाठी-०६स्वच्छतागृह व ०० मुतारी संख्या

* पिण्याच्या पाण्याची सुविधा नळांच्या तोटयांची संख्या ०६ ॲक्वागार्ड आहे.

* दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर :- योजना लागु नाही.

* अध्यापन अध्ययन साहित्य/ खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता. :- आहे.

* वाचन साहित्य विनासायास उपलब्ध. :- पुस्तकांची संख्या ३१७९ आहे.

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्याच्या विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम१८६०(१८६०चा २१) किंवा मुंबई सार्वजनीक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक ThMNC-NVMBI-P00112असा आहे, हा या कार्यालयाशी कोणत्याही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद ठाणे.